

पु. ल. देशपांडे

जन्मशताब्दी
गौरवग्रंथ

# पुलं
# असा असामी

संपादक
राजशेखर शिंदे

डॉ. शोभा नाईक यांना
स्नेह. राजशेखर शिंदे
२५ डिसें २०१९

# पुलं
# असा असामी

## पु. ल. देशपांडे
## जन्मशताब्दी गौरवग्रंथ

**संपादक**
राजशेखर शिंदे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

वाय २५४-१



**पुलं : असा असामी**
जन्मशताब्दी गौरवग्रंथ

: संपादक :
**राजशेखर शिंदे**

---

: प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
सयानी रोड, प्रभादेवी,
मुंबई ४०००२५

: मुद्रक :
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क,
कोल्हापूर-४१६ ००३.

© प्रकाशकाधिन

प्रथमावृत्ती : २०१९
मुखपृष्ठ : गिरीश सहस्रबुद्धे

मूल्य : ४७४/-

* या गौरवग्रंथात व्यक्त केलेली मते केवळ आणि केवळ स्वतः लेखकांची असून त्या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रम


: प्रस्तावना :
आनंदतरंग पुलं । नऊ

**विभाग पहिला**
पुलं : एक बायोस्कोप

वाहती जीवनसरिता । राजीव जोशी
। नारायण लाळे । ३
भाईकाका । जयंत देशपांडे । १२
मला दिसलेले भाई ।
विरुपाक्ष कुलकर्णी । उमा कुलकर्णी । १९
एक साहित्यिक मित्र । म. द. हातकणंगलेकर । २५
आठवणीतले पुलं । विजय भटकर । ३०
आजही पुलंच्या सहवासात ।
रघुनाथ माशेलकर । ३२
पुलं आणि बेळगाव । शोभा नाईक । ३४
एका पुलकित आनंदयात्रेची साक्ष ।
विद्याधर निमकर । ३८
पुलं गेले तेव्हा... । मुकेश माचकर । ४६
पुलंच्या कौटुंबिक आठवणी । सुचेता लोकरे, चिन्मय लोकरे, संतोष ठाकूर, संध्या कामत । ५०

**विभाग दुसरा**
एकटाच गातो मी गीत आनंदाचे :
पुलंचे कार्यपरिघातील बहुपैलू व्यक्तिमत्त्व

पुलं : अनेक पैलू । राम गबाले । ५७
मेहनती व कल्पक 'प्रोड्यूसर' । कृ. द. दीक्षित । ६३
कला– कॅलिडोस्कोप । दाजी भाटवडेकर । ६७
आकाशवाणीतील पुलं । सुनील शिनखेडे । ७४
एनसीपीएमधील साहेबीपणापलीकडचे पुलं
। अनुजा चवाथे । ७८
पुलं आणि वंगप्रेम । माधवी भट । ८२

**विभाग तिसरा**
गंधर्वाचे खळे :
परफॉर्मर । वक्ता । संगीत आणि चित्रपट

पुलंः काव्यात्म संवेदनेचा अखंड झरा ।
हेमकिरण पत्की । ८९
काव्यवाचनातील एकरूपता । तृप्ती बापट । १०३
'पुल'कित झालो आम्ही । निखिल रत्नपारखी । १०६
ऐसपैस परफॉर्मर । सुधीर गाडगीळ । ११५
पुलंः व्यक्ता कलावंत । श्याम पेठकर । ११८
'कानसेन' होण्याची अवघड तपश्चर्या ।
अरुणा ढेरे । १२३
संगीतकार पुलं । प्रशांत देशपांडे । १२८
पुलंची वाक्विलासिनी । शांता शेळके । १३१
पुलंचे चित्रपट । सतीश जकातदार । १४०
सबकुछ पुलंचा अलौकिक सिनेमा ।
समीर गायकवाड । १४४

**विभाग चौथा**

**दिव्यत्वाची येथ येते प्रचिती**

**विचार । भावना । दृष्टी ।**


खेळिया पुलं म्हणजे नटखट कन्हैयाच! । दिनकर गांगल । १५९

मराठी संस्कृतीचा एक आनंदयात्री । गं. ना. जोगळेकर । १६८

अशा या पुलंचे करायचे काय? । अविनाश सप्रे । १८२

पुलंचेः अनुभवविश्व नि विचारविश्व । रमा दत्तात्रय गर्ग । १८६


**विभाग पाचवा**

**भेटतील तोंडवळे जगात असे**


पुलं वुडहाऊस आणि पीजी देशपांडे । हर्षवर्धन निमखेडकर । १९९


**विभाग सहावा**

**पुलंच्या साहित्याचा सर्वांगीण विचार**


पुलंचे महाराष्ट्राला योगदान । मंगला गोडबोले । २२९

महाराष्ट्री मध्यमवर्ग, कलाव्यवहार, अभिरुची आणि पुलं । राम जगताप । २३४

पुलं देशपांडे यांची व्यक्तिचित्रे । विलास खोले । २५६

रंजनमूल्य असलेली पुलंची नाटके । रजनीश जोशी । २६७

पुलंच्या प्रवासवर्णनातील अक्षय नवता । प्रसाद नामजोशी । २९५

पुलंचे बालवाङ्मय । एकनाथ आव्हाड । ३०४

पुलंच्या रेडिओवरील कालातीत श्रुतिका । रेवती जोशी । ३१२

सुसंस्कृत पुलं । ग. बा. पळसुले । ३१९

पु. ल. देशपांडे यांच्या साहित्याची भाषा । आनन्द काटीकर । ३३२

'पुल'कित भाषांतरे : भाषांतरापलीकडचे काही । मुक्ता जगन्नाथ महाजन । ३३९


**विभाग सातवा**

**पुलंचा विनोद व विडंबन विचार**


वेगळ्या वाटेचे विनोदकार पुलं । मंगला गोडबोले । ३४७

गद्य विडंबनकार पुलं । स. गं. मालशे । ३६१

पुलंचा विनोद : विषय आणि आशय । विनीता तेलंग । ३६८

पुलंची विनोदी संपदा । नीला पांढरे । ३७६


**विभाग आठवा**

**कुणाचा आस्वाद कुणाची मल्लिनाथी**

**पुलंच्या पुस्तकांचे परीक्षण**


तुझे आहे तुजपाशी : नाट्यभास आणि वाचक-प्रेक्षक अभिरुची । गो. मा. पवार । ३८७

एका लेखकाचा गोतावळा । पुष्पा राजापुरे-तापस । ३९८

बटाट्याची चाळ : एका पिढीचा मूल्यविवेक । भारती निरगूडकर । ४१४

पूर्वरंग : प्रवासवर्णनातील रोचकता । रेवा हरी कुलकर्णी । ४२९

पुलंच्या नजरेतून गांधीजी । सुशील धसकटे । ४३३

मराठी वाङ्मयाचा (गाळीव) इतिहास : एक उल्लेखनीय, पण दुर्लक्षित । राम जगताप । ४४०

पुलंची व्यक्तिचित्रे आणि त्यांचा हिन्दी भाषिक वाचकवर्ग । नामदेव गपाटे । ४४८


**विभाग नववा**

**सत्य असत्याशी मन केले ग्वाही...**

**प्रतिकूल विचारातील अनुकुलता**


पुलं म्हणजे बाई अगदी पुलं... । मेघना पेठे । ४५५

या भवनातील गीत पुराणे... । मेघना भुस्कुटे । ४५८

पुलंच्या कालबाह्यतेच्या निव्वळ गप्पा । मुकेश माचकर । ४६७

**विभाग दहावा**

कितीदा समजून घ्यावे तुज...

मुलाखती

गप्पांमधून गवसलेले पुलं । आनंद यादव । ४७७

तरुण पुलं... तरुणाईसाठी पुलं । संजय नहार । ४८३

फैय्याज यांची पुलंविषयी बातचित

। सुधीर गाडगीळ । ४९१

**परिशिष्टे : संकलन – वैजयंती जाधव**

एक । पु. ल. देशपांडे : जीवनपट । ५००

दोन । पुलंची साहित्यसंपदा । ५०५

पुलंच्या साहित्याची संदर्भसाधने । ५१०

□□

✓

# पुलं

# पुलं आणि बेळगाव

शोभा नाईक

इस २०१९ हे पु. ल. देशपांडे जन्मशताब्दी वर्ष. त्यानिमित्त आठवणींना सगळीकडून उजाळा दिला जातोय. कारण महाराष्ट्राला आपल्या अपूर्व अशा विनोदी निवेदनशैलीने त्यांनी कित्येक दशके भारावून सोडले होते. त्यांची ही जादू अजूनही कमी झालेली नाही. खरेतर भारताच्या स्वातंत्र्योत्तर वाटचालीकडे अत्यंत मिश्किलपणे पाहत, त्यावर मर्मभेदक असे शेरे तितक्याच सहजतेने देत, हसवता हसवता आतली मेख व्यक्त करण्याची एक अनोखी हातोटी त्यांना जरूर लाभलेली होती. प्रस्थापित सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय व्यवस्थेत व्यक्तींचे, प्रवृत्तींचे किती विविध प्रकार अस्तित्वात येत असतात, हे त्यांच्या लेखणीने विनोदाच्या माध्यमातून दाखवण्याचा समर्थ प्रयत्न केलेला दिसतो.

श्रम संस्कृतीचे वेगळे महत्त्व अधोरेखित करण्याच्या प्रयत्नातील दिवसांत पुलं लिहीत होते. त्यातूनच कोकणातील निष्क्रिय होऊन गेलेली, पण इरसालपण घट्ट धरून असलेली मध्यमवर्गीय माणसे त्यांनी टिपण्याचा प्रयत्न केला, असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. अत्रेंच्या 'झेंडूची फुले'चा काहीसा प्रभाव त्यांच्यावर होता. अत्रेंच्या धर्तीवर पुलंनीही काही (काहीच्या काही) कविता लिहिलेल्या आहेत. त्यातून त्यांची चिकित्सक प्रवृत्ती कशा प्रकारची होती ते लक्षात येईल. तत्कालीन अधोरेखित झालेले वर्गभेद त्यांनी 'माणसाचा भरलेला खिसा' आणि 'रिकामा खिसा' अशा प्रतिमा योजत आपल्या लक्षात आल्याचे स्पष्ट केलेले होते. शंभर किलो धान्याचे पोते उचलता येणाऱ्याला ते विकत घेण्याची ऐपत नसणे आणि ज्याला ते विकत घेण्याची ऐपत असते त्याला ते उचलता न येणे ही आपल्या समाजात निर्माण झालेली विचित्र संगती त्यांनी टिपलेली होती. मोठेपणी श्रीमंत हॉटेलात पार्ट्या देणाऱ्या मित्रापेक्षाही लहानपणी मागितलेले नसतानाही हातावर खोबऱ्याची वडी ठेवणाऱ्या म्हातारीचे सांस्कृतिक मोल कितीतरी पटीने अधिक असल्याची नोंद त्यांनी दिलेली होती.

नाटके, एकांकिका, विनोदी किस्से, कथा कादंबऱ्या, प्रवासवर्णने, अनुवाद, व्यक्तिचित्रे, सिनेमाच्या पटकथा इत्यादी अनेकविध प्रकारांत चौफेर लेखन करून पुलं थांबले नाहीत, तर एकपात्री प्रयोगाच्या रुपात आपल्या लेखनाचे गावोगावी सादरीकरण करून आपला एक असा रसिक वर्ग त्यांनी निर्माण केला. स्वातंत्र्यानंतर मोठ्याप्रमाणात निर्माण होत असलेला मध्यमवर्ग पु. ल. देशपांडे यांच्या इतका विनोदाची पखरण करत अन्य कोणी विचारात घेतला आहे, असे दिसत नाही. बेळगावातील रसिकांचाही त्यांनी

असाच कान निर्माण केलेला आहे. बेळगाव येथील राणी पार्वतीदेवी महाविद्यालयामध्ये त्यांनी १९५० ते १९५२ या दरम्यान मराठीच्या प्राध्यापकपदी सेवा बजावलेली होती. त्या दरम्यानच्या प्राध्यापककक्षाने आस्वादलेला त्यांचा सहवास पुढे कित्येक दशके स्मृतिरुपात ताजा टवटवीत राहिलेला होता. त्यांच्या नंतर चारदशकांनी माझी नेमणूक तिथे झाली. पण तरीही तेथे दररोज त्यांच्या साहित्याच्या प्रेमातील प्राध्यापक भरूभरून त्यांच्याविषयी रंगून गप्पा मारत असताना मला पाहायला मिळाले. त्या 'पुलकित' प्राध्यापकांमध्ये अर्थशास्त्र, राजशास्त्र, तत्त्वज्ञान व इंग्रजी या विषयाचे प्राध्यापक सहभागी असत. त्या सर्वांना पुलंची जवळजवळ सगळीच चमकदार वाक्ये मुखोद्गत असत.

बेळगावात पुलंना त्यांचे स्नेही प्रा. बाबूराव रेगे यांनी बोलावून घेतले. इस्माईल युसुफ कॉलेजातील इंग्रजीचे प्राध्यापक कोरिया अफोन्सो हे त्यावेळी राणी पार्वतीदेवी महाविद्यालयाचे प्राचार्य होते. इतिहासतज्ज्ञ डॉ. अ. रा. कुलकर्णीही त्यावेळी आरपीडी महाविद्यालयात शिकवायला होते. अशावेळी पुलं कॉलेजात मराठी विभागात रुजू झाले. दोन वर्षे त्यांनी येथे प्राध्यापकी केली. त्या दरम्यान बेळगावातील आर्टस् सर्कल या संगीत व नाट्य कलांची मनोभावे जपणूक करणाऱ्या संस्थेशी त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले होते. रावसाहेब हरिहर व इतर स्नेह्यांसोबत गाणी, नाटक, साहित्य या कार्यक्षेत्रात ते व सुनीताबाई रमून गेले होते. पुलं आपल्या 'चित्रमय स्वगत'मध्ये 'या बेळगावानं आम्हाला इतका लळा लावला की, आयुष्यभर तिथेच राहावं असं आम्ही ठरवलं होतं...' असे नमूद केले आहे. कॉलेज सोडले त्यामुळे लळा लागलेले गाव दुरावल्याची रुखरुख लागल्याचेही त्यांनी नमूद केलेले आहे.

पुलंची बेळगावच्या आरपीडी कॉलेजमधील मराठीची प्राध्यापकी आजही गावातील साहित्य-प्रेमींच्या स्मरणातून बाजूला झालेली नाही. माझ्यासारख्या धाकटी पाती असलेल्या, पुलंनंतर चार पाच दशकं मागे पडल्यानंतर मराठी विभागात रुजू झालेल्या प्राध्यापकाला थोरली पाती त्याविषयी काय काय ऐकवत असे? तर 'ह्या खोली क्र. सहामध्ये (सर्वात मोठा वर्ग) त्यांचा वर्ग चाललेला असे, तेव्हा वर्ग विद्यार्थ्यांनी तुडुंब भरून जाईच, पण वर्गाबाहेर व्हरांड्यातही अन्य विद्यार्थी व गावकरीसुद्धा गर्दी करत असत.' 'अहो! पुलंचं काय सांगावं, जाताना त्या कोपऱ्यावरील नागोरीवाल्याकडे थांबत. कशी दिली मिठाई? या त्यांच्या प्रश्नाचे उत्तर आल्यावर भोवळ येऊन खाली पडत. मिठाईवाला घाबरून बाहेर पळत, ह्यांना उठवायला आला की आधी तुमचे ते दर कमी करा बुवा... म्हणत!', 'पुलंच्या कोटाचे खिसे नेहमी लिमलेटच्या गोळ्यांनी भरलेले असत. गल्लीतली लहान लहान पोरे समोर आली की पुलं त्यांच्या हातावर गोळ्या टेकवायला विसरत नसत.'

पुलं आमच्याकडे शिकवायला होते त्या दरम्यानच्या महाविद्यालयाच्या 'अनामिका' या वार्षिकाचे मराठी विभागाचे संपादन त्यांच्याकडे होते. विद्यार्थ्यांमध्ये लेखनाची, साहित्य वाचनाची आवड निर्माण करण्याची दृष्टी अर्थात त्यामागे असते. मुले कविता, कथा व अन्य प्रकारात काहीबाही लिहून आणत असतात. पुलंनी त्या अंकाला जे संपादकीय लिहिले आहे ते ग्रंथालयाने आजही जपून ठेवलेले तुम्हाला पाहायला मिळेल. त्यामध्ये 'साहित्यिक मराठी' असा त्यांनी केलेला प्रयोग पाहिला की, जीवन व साहित्य यांच्या मध्ये त्यांना कोणता संबंध अपेक्षित होता त्याची कल्पना येईल. त्यांच्या नेहमीच्या अत्यंत मिस्कील शैलीत त्यांनी लेखनासंदर्भात मराठी साहित्यातील रूढ पर्यावरण अचूक अधोरेखित केले आहे. 'कॉलेजच्या मासिकाचे लेखन म्हणजे सगळेच नवखे-(साहित्यिक मराठीत 'नवोदित') वडिलांचे अनुकरण ही बाळपणाची खूण बहुतेक सर्वांच्यात आढळते... बहुतेक लेखात भाषेचा डामडौल अगदी ख्यातनाम

आणि प्रथितयशींच्या पद्धतीने थाटलेला. काव्यांत देखील 'साहित्यात' अलीकडेच येऊन पडलेल्या कवट्या-हाडके-सापळे-पिस्टन वगैरे वस्तूही आढळत होत्या. कथांमधून अर्थात न अनुभवलेल्या 'प्रणयाच्या प्रमाथी संवेदना' आणि 'लज्जानुकूल कपोलावरील आठ्यां'चाही चमत्कार होता. कपोलाची कपाळाशी गफलत झाली आणि गालावर आठ्या येऊन प्रणयाचा कपाळमोक्ष झाला त्याची दाद 'साहित्यिक' शब्दांचे कळप हाकण्याच्या भरात आमच्या होतकरू साहित्यिकाला राहिली नाही. पण त्यांचा तरी त्यात काय दोष आहे?- वडील मंडळी तेच करत आहेत. नाही तरी - 'निळी अबोली', 'बीनाच्या ताणा', 'जलरंगाचे आलाप', 'नेत्रदीपक शैली', 'राष्ट्रातील प्रमाथी क्रांत' वगैरे चमत्कार ईये मराठीचिये नगरी काय कमी झाले आहेत? जीवन आणि साहित्य यांत फारकत झाली की हे असेच व्हायचे!' अशी त्यांनी केलेली नोंद आजही दिशादर्शक ठरते. श्री. कृ. कोल्हटकर यांचे 'वचनि लेखणीहि मराठी गिरा दिसो । सतत महाराष्ट्र-धर्म-मर्म वसी।।' हे वाक्य सर्वप्रथम उद्धृत करून त्यांनी आपले वरील म्हणणे संपादकीयात प्रकट केले आहे.

आरपीडी महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्त पुलंना संस्थेकडून आदराचे निमंत्रण गेलेले होते. सुनीताबाईंसह सुवर्णमहोत्सवाच्या पहिल्या दिवशी म्हणजे २९ जानेवारी १९९५ रोजी महाविद्यालयाला त्यांनी भेट दिली होती. त्यावेळी त्यांची प्रकृती बरी नव्हती. त्यांच्या मोठ्या गाडीत ते व सुनीताबाई दोघं होते. गाडीच्या मध्यभागी त्यांची खुर्ची म्हणजे जणू खाटच. आणि उजवीकडे कोपऱ्यात खुर्चीवर सुनीताबाई बसल्या होत्या. दुपारची तीनच्या सुमाराची वेळ होती. आम्ही मुख्य सभागृहाचे व्यासपीठ सुशोभित करणे वगैरे कामे आवरून संध्याकाळाच्या कार्यक्रमासाठी तयार होऊन यावे म्हणून घराकडे गेलो होतो. तेवढ्यात कॉलेजचा फोन आला. 'पु. ल. देशपांडे आपल्याकडे येणार आहेत... ताबडतोब या... ते फार वेळ थांबणार नाहीत...' झालं... मने हरखली. धावतच आम्ही कॉलेजात येऊन पोहचलो. प्राचार्य कक्षाबाहेर कॅरीडोरमध्ये एक आलिशान गाडी उभी होती. मराठी विभागाची विचारपूस पुलंनी केल्याबरोबर मला पुढे बोलावण्यात आले. खूप गर्दी दाटलेली होती. पुलंभोवती माणसांनी गराडाच घातलेला होता. प्रत्येकाशी ते काही ना काही हसत हसत बोलत होते. मी पुढे होऊन नमस्कार केला, माझी ओळख सांगितली. त्यांनी मराठीला विद्यार्थी आहेत? किती आहेत? कसे आहेत? हे विचारले. अभ्यास-क्रमाचीही आस्थेने चौकशी केली. त्यानंतर जे. पी. नाईक कोण लागतात का तुम्हाला? असाही प्रश्न विचारला? मग विभागात आणखी कोणकोण आहात? हा प्रश्न विचारला. त्यावर मी उत्तर दिले. माझ्या सहकारीही महिलाच आहेत हे कळल्यावर ते हसून म्हणाले 'पुरुषाचं मराठी कोण शिकवते?' मग मीही हसतच प्रत्युत्तर देताना ''ते आणखी काही वेगळं असतं का' असं म्हटलं. कितीतरी मोठा हशा कानावर आला. 'पुरुषाचं मराठी' या त्यांच्या हजरजबाबी श्लेषावर काय उत्तर द्यावे ते तेव्हा लक्षात आलं नव्हतं, पण खूपच प्रसन्न करून गेलं होतं त्यांच्याशी झालेलं बोलणं!

पु. ल. देशपांडे यांनी लिहिलेल्या 'उरलंसुरलं' या ग्रंथात प्रकाशित केलेल्या 'काहीच्या काही कविता' आपले लक्ष वेधतात. त्यांच्या त्या कवितेला विडंबन कवितेचा बाज आहे. पण त्यातून त्यांनी चपखलपणे सभोवताली प्रसारित झालेल्या मानवी प्रवृत्तींचे केलेले अधोरेखन दुर्लक्षिता येत नाही. पुलं राहत त्या पुण्यात त्यांना जे दिसले ते त्यांनी अशाच एका कवितेत पुढीलप्रमाणे व्यक्त केलेले आढळते. 'मी राहतो पुण्यात/म्हणजे विद्वत्तेच्या 'ठाण्या'त/ इथल्या मंडईचेही विद्यापीठ आहे आणि विद्यापीठाची मंडई झाली आहे/ बोलणे हे इथला धर्म आहे/ आणि ऐकणे हा दानधर्म आहे/ म्हणून वक्ते उपदेश करतात/आणि श्रोते उपकार करतात/उपचारांना मात्र



सौजन्य : राम कोल्हटकर, पुणे

सौ. सुनीताबाई, कवयित्री इंदिरा संत, प्रकाश ना. संत आणि पुलं

जागा नाही.' असे लिहिणारे पुलं बेळगावसारख्या एका लहानशा गावाबाबत मात्र जिव्हाळा प्रकट करतात, हे खरोखर विचार करण्यासारखे वाटते! पुलंना अनेक भाषा येत असत. त्यांना बंगाली, गुजराती, तसेच कन्नड या भाषा येत असत. बेळगावनजीक चंदगड जवळील जंगमहट्टी हे त्यांचे वाडवडिलार्जित गाव. त्यामुळे त्यांच्या मनात इकडच्या परिसराबाबत जिव्हाळा होता. इकडून काही माणसे पुण्याकडे गेली की हमखास बेळगावचा त्यांना आवडणारा कुंदा घेऊन जात असत. अशीच एक आठवण माझ्या कामत नावाच्या एका मैत्रिणीने सांगितली आहे. बेळगावहून त्यांना भेटायला जाणाऱ्या माणसांशी पुलं आणि सुनीताबाई अतिशय आपुलकीने वागत आणि विचारपूस करत असत.

त्यांनी अनेक अजरामर अशी व्यक्तिचित्रे रेखाटून त्यांना अजरामर केले असल्याचे आपण जाणतोच. ती व्यक्तिचित्रे त्यांनी त्यांचे वास्तव्य ज्या ज्या ठिकाणी होते तेथील लोकप्रवृत्तींतून उचलली. रावसाहेब हे त्यांच्या 'गणगोत'मध्ये भेटणारे, तमाम रसिकांना भावणारे एक लोभस असे व्यक्तिचित्र त्यांना बेळगाव मुक्कामी प्राप्त झालेले आहे. बेळगावचे संगीतप्रेमी कृष्णराव हरिहर म्हणजेच रावसाहेब व त्यांचा कोनवाळ गल्लीतील संगीत व नाट्यप्रेमींचा रिट्झ सिनेमागृहात अड्डा भरत असे. दररोज नित्यनेमाने भरणारा हा बैठकीचा अड्डा पुलंना बेळगावशी कायमचा जोडून देणारा ठरला. रावसाहेब या व्यक्तिचित्रात पुलंची दोन वर्षे बेळगावात कशी गेली व कोणाकोणाबरोबर गेली ते त्यांनी स्पष्ट लिहिले आहे. त्यांच्या लेखनामुळे, बेळगावातील संगीत व नाटक यांच्या सेवेत स्वतःला वाहून घेणाऱ्या रावसाहेबांची, त्यांच्या खास बेळगावी भाषेची, लकबींची त्या बरोबरच आमच्या पं. विजापुरेगुरुजी, मुधोळकर, डॉ. हरमशेट, कागलकरबुवा, नाईकमास्तर इत्यादींसारख्या बेळगावी मातब्बरांची अनेक मराठी रसिकांना विसरता न येणारी ओळख झाली आहे. आज पुलंच्या जन्मशताब्दीनिमित्त या सर्व मातब्बरांचीही स्मृती जागी होऊन उठते आहे, याचा आनंद होतो. पुलं म्हणजे अनेक अजब माणसांचा संचय हे बेळगावातही आम्ही अनुभवतो!

□